सन २०१९-२० राज्य योजनेंतर्गत प्रशासकीय इमारतीचे बांधकाम (४४०६-००२६) भंडारा वनविभागातील नाकाडौंगरी येथे वनपरिक्षेत्र कार्यालयाचे चे बांधकामाकरिता निधी वितरीत करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग,
शासन निर्णय क्र.वनबां-२०१९/प्र.क्र.१७८/फ-९
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक :- २८ मे, २०१९

<u>वाचा :-</u>

१. वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०१९/प्र.क्र.४४/अर्थ-३, दि. ०१ एप्रिल, २०१९
२. महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्रमांक:बीयुडी-२०१९/२४१५/प्र.क्र.५८/ब-१, दि.०१.०४.२०१९
३. प्रधान मुख्य वनसरंक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे पत्र क्र.कक्ष- १/पी/यो/नबाप्र/प्र.क्र.४१/१६९/२०१९-२०, दिनांक १४.५.२०१९
४. मुख्य वनसंरक्षक (प्रा.) नागपूर यांचे पत्र क्र.कक्ष-१२/यो/प्र.क्र.०७/१०७/२०१९-२०, दिनांक ०४.०५.२०१९

<u>प्रस्तावना :-</u>

सन २०१९-२० करिता प्रशासकीय इमारतीचे बांधकाम (४४०६-००२६) या लेखाशिर्षाअंतर्गत ५०-इतर खर्च रु.२२०.०० लक्ष व ५३-मोठी बांधकामे रु.१९८०.०० लक्ष असे एकूण रु.२२००.०० लक्ष नियतव्यय मंजूर व अर्थसंकल्पित करुन दिलेला आहे.

वित्त विभागाच्या संदर्भ क्र.१ च्या परिपत्रक व संदर्भ क्र.२ च्या शासन निर्णयान्वये महाराष्ट्र विनियोजन विधेयक, २०१९ ला अनुसरुन मागणी क्र.सी-१०, ४४०६-"वनीकरण व वन्यजीवन यावरील भांडवली खर्च" या मुख्य लेखाशीर्षाखाली दिनांक १ एप्रिल, २०१९ ते ३१ जुलै, २०१९ या कालावधीतील खर्च भागविण्यासाठी मंजूरी देण्यात आली आहे. त्यानुसार सन २०१९-२० करिता प्रशासकीय इमारतीचे बांधकाम (४४०६-००२६) या राज्य योजनेतंर्गत ५०-इतर खर्च रु.७३.३३ लक्ष व ५३-मोठी बांधकामे रु.६६०.०० लक्ष असे एकूण रु.७३३.३३ लक्ष इतका निधी वितरीत करण्यास मंजूरी देण्यात आली आहे.

सदर योजनेअंतर्गत अर्थसंकल्पित असलेल्या नियतव्ययाच्या अनुषंगाने प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचेकडून संदर्भ क्र.३ अन्वये मुख्य वनसंरक्षक (प्रा.), नागपूर वनवृत्तातील भंडारा या वनविभागातील नाकाडौंगरी येथे वनपरिक्षेत्र कार्यालयाचे चे बांधकामाकरिता ५३- मोठी बांधकामे रु.३०.९९ लक्ष रकमेचा नवीन बाब प्रस्ताव प्राप्त झाला आहे. संदर्भ क्र.४ नुसार सदर कामास वनअभियंता , महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी तांत्रिक मान्यता व मुख्य वनसंरक्षक (प्रा.) नागपूर यांनी प्रशासकीय मान्यता प्रदान केली आहे. सदर प्रस्तावास शासन मंजूरी प्रदान करुन BDS वर अनुदान उपलब्ध करुन देण्याकरीता विनंती केली आहे. त्यानुसार या कामासाठी अनुदान वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

शासन निर्णय :-

प्रधान मुख्य वनसरंक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यानी संदर्भ क्र.३ नुसार सादर केलेला प्रस्ताव व वित्त विभागाचे संदर्भ क्र.१ येथील परिपत्रक व संदर्भ क्र.२ चा शासन निर्णय विचारात घेता प्रस्तावातंर्गत मागणी लक्षात घेऊन राज्य योजनेअंतर्गत प्रशासकीय इमारतीचे बांधकाम (४४०६ ००२६) या योजनेमधून मुख्य वनसंरक्षक (प्रा.) नागपूर वनवृत्ताकडील खालील तक्त्यात दर्शविण्यात आलेल्या इमारत बांधकामासाठी सन २०१९-२० करीता **रु.३०.९९ लक्ष** इतका निधी वितरीत करण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे:-

अ. क्र.	वनवृत्त	वन विभाग	कामाचा तपशिल	सन २०१९-२० करीता प्रस्तावित रक्कम (रु.लाखात)
१	मुख्य वनसंरक्षक (प्रा.) नागपूर	भंडारा	नाकाडौंगरी येथे वनपरिक्षेत्र कार्यालयाचे चे बांधकाम	३०.९९
			एकूण :-	**३०.९९**

उपरोक्त अनुदानाचा वापर करण्याच्या दृष्टीने (४४०६-००२६) या लेखाशिर्षा अंतर्गत विहीत केलेल्या खालील अटी व शर्तीचे पालन करणे संबंधितावर बंधनकारक राहील.

१. सदर निधीसाठी नियंत्रक अधिकारी म्हणून प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प,नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर हे राहतील. त्यांच्याकडे हा निधी सुपूर्द करण्यात येत आहे.

२. उपरोक्त खर्च विहीत कार्यपध्दतीनुसार तसेच अर्थसंकल्प वितरण प्रणालीवर उपलब्ध मासिक निधी प्रवाहानुसार खर्च करण्यात यावा. यामध्ये कोणतीही वित्तीय अनियमितता होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.

३. नियंत्रक प्राक्कलन अधिकाऱ्यांनी दिनांक १ एप्रिल, २०१९ ते ३१ जुलै, २०१९ या मुदतीत त्यांच्याकडे सुपुर्द केलेल्या अनुदानापेक्षा कोणत्याही परिस्थितीत खर्च जास्त होणार नाही, याची दक्षता घ्यावी.

४. नियंत्रक अधिकाऱ्यांना सूचित करण्यात येते की, एकूण वितरीत केलेल्या/करण्यात येणाऱ्या तरतूदीपेक्षा कोणत्याही परिस्थितीत अतिरिक्त खर्च होणार नाही, याची दक्षता घ्यावी.

५. सदर तरतूद खर्च करतांना वित्त विभागाने वेळो वेळी घालून दिलेल्या अटी व शर्तीचे पालन करावे.

६. सदरहू निधी वितरित करण्यापूर्वी प्रस्तावानुसार योजनेतील निश्चित केलेल्या सर्व कामांना सक्षम अधिका-यांची तांत्रिक व प्रशासकीय मंजूरी प्राप्त आहे याची खात्री प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन विकास), म.रा. नागपूर यांनी करुन घ्यावी.

७. वाटप करण्यात येणा-या अनुदानातून खर्च करताना यामध्ये कोणतीही वित्तिय अनियमितता होणार नाही याची दक्षता घ्यावी. तसेच सदरहू कामे करतांना वन (संवर्धन)

कायदा १९८० मधील तरतुदींचा भंग होणार नाही तसेच सर्वोच्च न्यायालय/उच्च न्यायालय/केंद्र शासनाच्या व्याघ्र संवर्धन प्राधिकरण यांनी दिलेल्या मार्गदर्शक सुचना/आदेशाची अवहेलना होणार नाही याची सुध्दा दक्षता घ्यावी.

८. सदर आर्थिक वर्ष २०१९-२० मध्ये मंजूर व वितरीत अनुदानाच्या मर्यादेत खर्च सिमित ठेवावा.

९. सदरहू मंजूर करण्यात आलेले अनुदान संबंधित कोषागारातून काढून घेतल्यानंतर काढण्यात आलेली रक्कम महालेखापाल कार्यालयातील लेख्यात त्याच शिर्षाखाली नोंदली गेली आहे किंवा नाही याची खात्री करुन घ्यावी व त्याबाबतचे प्रमाणपत्र शासनास सादर करावे.

१०.संस्थेने मागील वर्षाकरिता त्यांनी उपलब्ध करुन दिलेल्या अनुदानाच्या विनियोगाबाबतचे प्रमाणपत्र शासनास तसेच महालेखापालांना तात्काळ सादर करावे. त्याचप्रमाणे, आता वितरित करण्यात येत असलेल्या अनुदानाचे तपशिलवार देयक व विनियोग प्रमाणपत्र देखिल (Utilization Certificate) महालेखापाल, लेखा परिक्षा, महाराष्ट्र-२ नागपूर व शासनाला तातडीने सादर करावे.

११.उपरोक्त अनुदानामधून केलेल्या खर्चाचे स्वतंत्र लेखे व पुस्तके तपासण्याचे अधिकार महालेखापाल, महाराष्ट्र-२, नागपूर यांना राहतील व त्याकरीता सदर संस्था त्यांना संपूर्ण सुविधा उपलब्ध करुन देईल.

१२.प्रत्यक्ष खर्च करण्यापूर्वी विहीत पध्दतीचे पालन करावे व आवश्यकतेनुसार आहरण करावे.

१३.सर्व कामे दर्जेदार होतील याबाबत योग्य शासन कार्यप्रणालीचा वापर केला जाईल व कोणतीही अनियमितता होणार नाही तसेच सर्व कामांच्या गुणवत्तेबाबत वेळोवेळी आवश्यकतेनुसार तपासणी करावी या सर्व बाबींची जबाबदारी मुख्य वनसंरक्षक (प्रा.) पुणे यांची राहील.

१४.शासन निर्णय दिनांक ०१ डिसेंबर, २०१६ नियम पुस्तिकेत नमुद केल्यानुसार तसेच उद्योग उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय दिनांक २४ ऑगस्ट, २०१७ मध्ये नमूद गव्हर्नमेंट ई-मार्केटप्लेस (GeM) पोर्टलची कार्यपध्दती नुसार निविदा प्रक्रियेत ई-निविदा प्रणालीचा वापर करावा.

१५.सदर खर्च वित्त विभागाच्या दिनांक ०१.०४.२०१९ चे परिपत्रकातील अटींची व महसूल व वन विभागाच्या दिनांक ०१.०४.२०१९ शासन निर्णयामध्ये नमूद केलेल्या अटीची पूर्तता होईल, याची दक्षता घेण्यात यावी.

१६.सदर मंजूरीस शासन निर्णय क्रमांक एमएससी- २०११/प्र.क्र. १७८/फ-५, दिनांक ३०.९.२०११ च्या परिशिष्टात नमुद केलेल्या अटी व शर्ती बंधनकारक असतील.

उपरोक्त खर्च मागणी क्रमांक सी-१०, प्रधान लेखाशिर्ष ४४०६, वनीकरण व वन्यजीवन यावरील भांडवली खर्च, राज्य योजना अंतर्गत योजना, (०१) वनीकरण, ०७० दळणवळण व इमारती, (००) (०२) वनातील इमारती बांधकाम (४४०६ ००२६) या लेखाशिर्षाखाली सन २०१९-२० करिता उपलब्ध होणाऱ्या अनुदानातून भागविण्यात यावा.

सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या दिनांक ०१.०४.२०१९ च्या परिपत्रकान्वये तसेच वित्त विभागाच्या शासन निर्णय क्र.विअप्र/२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनिमय, भाग-२, दिनांक १७.४.२०१५ अन्वये विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारास अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.inया संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०५२८१४३१५८८४१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

SUJAY DEORAO DODAL

Digitally signed by SUJAY DEORAO DODAL
DN: c=IN, st=Maharashtra,
2.5.4.20=353112ee0fa47f9ff9bedae88f651d09fdb142df5fbce9c004f7ee
a06d8b9baf, postalCode=400032, street=MANTRALAYA,MUMBAI,
serialNumber=a6a471816b9dbfd727f2e5ec4825f4678c8393d846acd1c
16b8936c8b3a519c6, ou=REVENUE AND FOREST, o=GOVERNMENT OF
MAHARASHTRA, cn=SUJAY DEORAO DODAL
Date: 2019.05.28 14:41:59 +05'30'

(सुजय दोडल)
सह सचिव (वने)
महसूल व वन विभाग

प्रत :-

१. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर
२. प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प,नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर
३. मुख्य वनसंरक्षक (प्रा.), नागपूर
४. उपवनसंरक्षक, भंडारा
५. महालेखापाल-१/२ (लेखा परिक्षा/लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र राज्य, मुंबई / नागपूर.
६. सह सचिव/उपसचिव,वित्त विभाग (अर्थ-३)/(व्यय-१०), मंत्रालय, मुंबई-३२.
७. उप सचिव, नियोजन विभाग (का-१४७५), मंत्रालय, मुंबई-३२.
८. कार्यासन अधिकारी, फ-२/ब-१ कार्यासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
९. कार्यासन फ-९, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.(निवडनस्ती)